# को.ए.सो. केशवजी वीरजी कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक शाळा, पनवेल

मार्च २०१६ शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा एकूण निकाल ८९.१५% लागला. शाळेतून एकूण ३६९ विद्यार्थिनी प्रविष्ठ झाल्या. कु. हर्डिकर गंधाली प्रदीप ही विद्यार्थिनी ९४.२०% गुण मिळवून शाळेत प्रथम आली.

उच्च माध्यमिक कला विभागात एकूण ६४ विद्यार्थिनी प्रविष्ठ झाल्या त्यापैकी ५८ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. कला विभागाचा एकूण निकाल ९०.६३% लागला. कु. गुप्ता शिवानी अशोक ही विद्यार्थिनी ७६.४६% गुण मिळवून कला विभागात प्रथम आली.

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत कु.म्हात्रे संहिता संतोष या विद्यार्थिनीला जिल्हास्तरीय विशेष प्राविण्य प्राप्त झाले. कोकण प्रज्ञा शोध परीक्षेत १० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कु.म्हात्रे आरती रंगनाथ १०२ गुण तर कु. लिमये कस्तुरी मिलींद हिने १०१ गुण प्राप्त केले. इतिहास व भूगोल प्रज्ञा शोध परीक्षेला बऱ्याच विद्यार्थिनी सहभागी झाल्या व उत्तीर्ण झाल्या. मागील वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत कु. म्हात्रे आरती रंगनाथ हिचा जिल्ह्यात ३२ वा क्रमांक आला.

आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धेत इ. ८ वी ते १० वी गटात कु. म्हात्रे संहिता संतोष हिने तृतीय क्रमांक मिळविला. उच्च माध्यमिक इ.११ वी, १२ वी गटात कु. म्हात्रे अंकिता अनिल हिने प्रथम क्रमांक पटकाविला. गीत गायन स्पर्धेत इ. ५ वी ६ वी गटात कु. करंबेळकर शर्वरी हेमंत हिला प्रथम क्रमांक मिळाला व इयत्ता ९ वी १० वी गटात कु. चौधरी मानसी आदिक हिला तृतीय क्रमांक मिळाला.

वाक्स्पर्धेत इ ५ वी ६ वी गटात कु. महाजन सायली मोहन मराठी विषयात तृतीय, तर हिंदी विषयात कु. करंबळेकर शर्वरी हेमंत हिला प्रथम क्रमांक मिळाला. ७ वी ८ वी गटात मराठी विषयात कु. म्हात्रे आरती रंगनाथ हिला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. हिंदी विषयात कु. खाने प्रिती सुनिल हिने प्रथम तर इंग्रजी विषयात कु. सहजराव आम्रपाली सुभाष हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. ९ वी १० वी गटात इंग्रजी विषयात कु. गोपले ओजस्वी समेळ हिने द्वितीय तर कु. म्हाते संहिता संतोष हिने मराठी विषयात प्रथम क्रमांक मिळविला.

जीवनदीप चित्रकला स्पर्धेत गट ८ वी कु. पाआील सायली संदीप हिचा प्रथम तर गट ७ वी कु. टाक मनोज हिचा तृतीय क्रमांक आला. एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड ड्रॉईंग परीक्षेचा निकाल १००% लागला.

स्वर्गीय मा. दादा यांच्या स्मृतिदिनानिमित्त हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या सुप्तकलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध सहशालेय उपक्रम आयोजित केले जातात. गुरूपौर्णिमा कार्यक्रमानिमित्त वर्ग सजावट, शैक्षणिक साहित्य स्पर्धा, लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा, थोर नेत्यांची जयंती साजरी करण्यात येते.

दिनांक ३१ डिसेंबर २०१५ ते ०२ जानेवारी या दरम्यान पनवेल येथे जिल्हास्तरीय स्काऊट गाईड मेळावा भरविण्यात आला. शोभा यात्रेत लेझिम पथकास प्रथम क्रमांकाची ढाल मिळाली. पनवेल नगरपालिका आयोजित प्रजासत्ताक दिनी संचलनामध्ये आर. एस.पी. प्लॅटूनला द्वितीय क्रमांकाचे बक्षिस प्राप्त झाले.

संगित शिक्षक श्री. विद्याधर शिवराम ठाकूर यांनी महाराष्ट्र शासनातर्फे जलयुक्त अभियान ध्वनीमुद्रिका तयार केली. तसेच कला क्षेत्रात पनवेल भूषण पुरस्कार प्राप्त झाला. कला क्षेत्रातील दिग्गज गायक विठ्ठल उमप, उत्तरा केळकर, वैशाली सामत यांच्या समवेत अल्बम प्रकाशित झाला.

कै. नरहर शंकर जोशी सामाजिक संस्था ठाणे तर्फे आयोजित निबंध स्पर्धेत श्रीमती साठे रचना रामचंद्र यांना तालुक्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

सध्या इमारत विस्तार वाढविण्याचे काम सुरू आहे. अशा रितीने डिसेंबर २०१६ मध्ये शाळेला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने शाळेची अमृत महोत्सवी वाटचाल सुरू आहे.



कु. हर्डिकर गंधाली प्रदीप
एस. एस.सी. (९४.२०%)



कु. गुप्ता शिवानी अशोक
एच.एस.सी.-कला (७६.४६%)



कु. म्हात्रे आरती रंगनाथ
प्रज्ञाशोध परीक्षा (शिष्यवृत्तीधारक)



श्रीम. साठे रचना रामचंद्र
तालुकास्तरीय निबंध स्पर्धा-प्रथम



श्री. ठाकूर विद्याधर शिवराम
पनवेल भूषण पुरस्कार प्रदान




शाळेच्या वार्षीक स्नेह संमेलन कार्यक्रम प्रसंगीचे छायाचित्र



पनवेल नगरपालिका आयोजित संचलनामध्ये आर.एस.पी. प्लॅटूनला व्दितीय क्रमांक